Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal

ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052 (UIF) Volume - 5 | Issue - 7 | Jan - 2016

बी.एड. विद्यार्थी - शिक्षकांमध्ये मूलभूत अधिकार व कर्तव्यांबाबत असलेल्या जाणिव जागृतीचा अभ्यास

दत्ता शंकर वाघमारे
(सहाय्यक प्राध्यापक)
कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन,सोलापूर

प्रस्तावना :-

भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने मंजूर केला.त्यानूसार भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. भारताची स्वतंत्र राज्यघटना तयार करण्याची प्रक्रिया सुरु झाली. संविधान समिती गठित करण्यात आली या समितीने संविधान निर्मितीचे काम सुरु केले. संविधान २६ नोंव्हेबर १९४९ रोजी मंजुर केले . व २६ जानेवारी १९४९ पासून घटनेची प्रत्यक्ष अंमलबजावणीस सुरुवात झाली.

भारताचे संविधान तयार करताना अमेरिका,रशिया ,इंग्लंड, कॅनडा, फ्रान्स व दक्षिण आफ्रिका इ. देशाच्या संविधानाचा संदर्भ घेऊन जगातील इतर कोणत्याही देशामध्ये नसलेली विस्तृत व प्रत्येक बाबींचे स्पष्टीकरण करणारी घटना घटनाकारांनी तयार केली.

कोणताही देश नियमांच्या आधारे चालतो. देशाच्या कामकाजासाठी निरनिराळया नियमांनी गरज असते. ते नियम एका पुस्तकात अंतर्भूत केलेले असतात. त्या नियमांच्या संचाला राज्यघटना किंवा संविधान असे म्हणतात.

संविधान म्हणजे देशाचा मूलभूत कायदा असतो. इतर सर्व कायदे संविधानापेक्षा दुय्यम असतात. संविधान हे शासन चालविण्याचे साधन आहे.

देशातील संविधानात शासन आणि नागरिक यातील सबंधाचे स्वरुप निश्चित केले जाते.संविधानात नागरिकांच्या हक्काचा समावेश आहे. अशा या भारतीय संविधानात २२ भागात ,३९५ कलमे व ९२ परिशिष्टामध्ये विभागले आहे.

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकार आवश्यक व महत्वाचे वाटतात. त्यांचा समावेश राज्यघटनेत केला जातो.भारतीय राज्यघटनेत नागरिकांचा मूलभूत हक्क आणि कर्तव्यांचा समावेश आहे. कर्तव्याचा व अधिकाराचा हेतू लोकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत करणे हा आहे.

मूलभूत अधिकार व कर्तव्य

न्यायालयीन संरक्षण असणारे न्याय अधिकार म्हणजेच मूलभूत अधिकार होत. घटनेने नागरीकांना प्रदान केलेल्या अधिकारांना नैसर्गिक किंवा मूलभूत अधिकार असे म्हटले जाते. त्याचा उद्देश सरकारला तसेच कायदेमंडळाला मनमानी करण्यापासून रोखणे आणि व्यक्तिला आपला विकास करण्याची पूर्ण संधी देणे हा आहे.या अधिकारांसाठी न्यायालयात दाद मागता येते

भारतीय राज्यघटनेतील मुलभूत अधिकार देशातील सर्व संस्थाना बंधनकारक आहेत. भारतात लोकशाही ख-या अर्थाने स्थिर व यशस्वी करावयाचे असेल तर व्यक्तीस्वातंत्र्य जपले पाहिजे . व्यक्तीस्वातंत्र्य जोपासण्यासाठी ते सुरक्षित ठेवण्यासाठी व्यक्तीला काही मुलभूत स्वरुपाचे अधिकार देणे क्रमप्राप्त ठरते. घटनाकारांनी मुलभूत अधिकारांचे महत्व ओळखूनच त्यांचा समावेश राज्यघटनेत केला आहे. प्राध्यापक लास्की यांच्यामते व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी मुलभूत अधिकाराची गरज असते. म्हणूनच भारतीय राज्यघटनाकारांनी घटनेत नागरिकांना सात प्रकारचे मुलभूत अधिकार दिले आहेत.भारतीय राज्यघटनेच्या तिस-या विभागात कलम १२ ते ३५ या कलमात मूलभूत अधिकार देण्यात आलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत...

१. समतेचा अधिकार
२. स्वातंत्र्याचा अधिकार
३. शोषणाविरुधचा अधिकार
४. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार

५. सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार
६. मालमत्तेचा अधिकार (संपत्तीचा)
(१९७८ च्या ४४व्या घटनादुरुस्तीनूसार मालमत्तेचा अधिकार मूलभूत अधिकाराच्या यादीतून कमी करण्यात आलेला आहे.)
७. घटनात्मक उपायांचा अधिकार

मूलभूत कर्तव्ये (Fundamental duties)

भारतीय राज्यघटनेत मूलभूत कर्तव्यांचा समावेश केलेला नव्हता . घटनाकारांनी नागरिकांना मूलभूत अधिकार दिले त्यावेळी नागरिकांनी मूलभूत अधिकारांचा उपयोग घेतानां काही कर्तव्ये पार पाडावीत असे घटनाकारांनी गृहित धरले होते. वास्तविक हक्क आणि कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. परंतू गेली ६५ वर्षाच्या अनेक अनुभवावरुन एक गोष्ट मात्र प्रकर्षाने निर्दशनास येते , ती म्हणजे भारतातील जनतेला आपल्या हक्काची जाणीव झालेली आहे. त्यामानाने कर्तव्यांची जाणीव मात्र झालेली नाही. भारतीय जनतेला राज्याकडून अनेक गोष्टींची अपेक्षा आहे परंतू आपणही राज्यासाठी काहीतरी केले पाहिजे याचा विसर जनतेला पडू लागला आहे. आपण राज्याकडून काय अपेक्षा करतो यापेक्षा आपण राज्यासाठी (समाजासाठी) काय सेवा करतो याची जाणीव करुन देण्याची गरज निर्माण झाली आहे. म्हणूनच भारतीय जनतेला कर्तव्याची जाणीव करुन देण्यासाठी घटनेत मूलभूत कर्तव्यांचा समावेश करणे भाग पडले आहे. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीने भारतीय घटनेत १० मूलभूत कर्तव्यांचा समावेश केलेला आहे .भारतीय घटनेच्या प्रकरण ४ क मधील ५१ क या कलमात पुढील १० मूलभूत कर्तव्यांचा समावेश केलेला आहे .

१. सविधानाचा आदर करणे
२. राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे
३. आपल्या देशाचे संरक्षण करणे
४. भारताच्या सर्व नागरिकांविषयी बंधुभाव बाळगणे
५. पर्यावरणाचे रक्षण करणे
६. वैज्ञानिक दृष्टीकोन स्विकारणे
७. सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे .
८. भारताची सार्वभौमता , एकता आणि एकात्मता यांचा सन्मान करुन त्यांचे संरक्षण करणे
९. आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढयाला ज्यामुळे स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करुन त्यांचे पालन करणे
१०. शास्त्रीय दृष्ट्रिकोन ,मानवतावाद ,शोधक बुध्दी आणि सुधारणावाद यांचा विकास करणे

वरील मूलभूत कर्तव्यांची अंमलबजावणी ३ जानेवारी १९७७ पासून सुरु झाली .

संशोधनाची गरज

१. लोकशाही शासनप्रणाली असणा-या या देशात लोकनियुक्त प्रतिनिधी शासन चालवितो म्हणजे उदयाचा शासनकर्ता आजचा विदयार्थी असतो. म्हणून त्यांना घटना घडविणा-या विदयार्थी शिक्षकांमध्ये संविधानाविषयी कितपत जाणीव आहे हे जाणून घेण्यासाठी प्रस्तूत संशोधनाची गरज आहे.
२. आजचा बी. एड.चा विदयार्थी शिक्षक उदयाचा भावी शिक्षक आहे.या भावी शिक्षकाला राज्यघटना ,मूलभूत हक्क व अधिकार या राज्यघटनेच्या मूलभूत ज्ञानाविषयीची विदयार्थी शिक्षकामधील असणा-या जागृतीचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.
३. आजचा बी. एड. चा विदयार्थी शिक्षकामध्ये भारतीय संविधानातील हक्क व कर्तव्याविषयी अधिक व्यापक प्रमाणात जाणीव करण्यासाठी बी. एड. स्तरावर काही उपक्रम राबविता येतात का ? हे अभ्यासण्यासाठी संशोधनाची गरज आहे.
४. बी. एड.चा विदयार्थी शिक्षकांधील भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्याबाबत असणा-या जागृतीचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.
५. बी. एड. विदयार्थी शिक्षकांमधील भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांबाबत असणा-या जागृतीचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनामध्ये सोलापूर शहरातील बी. एड. महाविदयालयातील विदयार्थी शिक्षकांचाच विचार केलेला आहे.

संशोधनाची मर्यादा

सदरहू संशोधनामध्ये सोलापूर शहरातील सोलापूर विदयापीठ सोलापूर , एस. एन.डी.टी. विदयापीठाशी संलग्नित बी. एड महाविदयालया व्यतीरिक्त इतर महाविदयालयांचा विचार केलेला नाही.

प्रस्तुत संशोधनासाठी बी. एड . महाविदयालयातील विदयार्थी शिक्षकाव्यतिरिक्त इतर महाविदयालयातील विदयार्थ्यांचां विचार केलेला नाही.

संशोधनाची उद्दिष्टये

१. बी. एड . विदयार्थी शिक्षकांमध्ये भारतीय संविधानातील मूलभूत हक्क व कर्तव्ये यांच्याबद्दल जागृतीचा अभ्यास करणे.
२. बी. एड. विदयार्थी शिक्षकामध्ये मूलभूत हक्क व कर्तव्याबाबत जाणीव जागृतीकरण्यासाठी उपाय सुचविणे .

संशोधन कार्यपद्धती

१. संशोधन पद्धतीची निवड

प्रस्तुत संशोधनाचे उद्दिष्टये व स्वरुप विचार करता सदरहू संशोधन वर्णनात्मक संशोधनपद्धतीमधील शालेय सर्वेक्षण या पदधतीची निवड केली आहे.

२. **संशोधन साधने**

बी. एड . विदयार्थी शिक्षकाडून माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे.

३. **नमुना निवड**

सोलापूर शहरातील पाच बी. एड . महाविदयालयातील प्रत्येक महाविदयालयातील २० विदयार्थी असे एकूण १०० विदयार्थी शिक्षकांची प्रस्तुत संशोधनासाठी निवड करुन त्यांच्याकडून प्रश्नावली भरुन घेतली.

४. संख्याशास्त्रीय परिमाण

सदरहू संशोधनासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर केला आहे.

संशोधनाचे निष्कर्ष

१. बी.एड. महाविद्यालयातील ४७.५० टक्के विद्यार्थी शिक्षकांना भारताने संविधानाचा स्विकार २६ नोव्हेंबर १९४९ रोजी करण्यात आला आहे हे अचूकपणे माहिती नाही.

२. बी.एड. महाविद्यालयातील १० टक्के विद्यार्थी शिक्षकांना भारतीय राज्यघटनेचा अर्थ अचूकपणे नोंदविता आला नाही. तर ४५ टक्के विद्यार्थी शिक्षकांनी भारतीय राज्यघटनेचा अर्थ लिहिणे टाळले आहे.

३. बी.एड. महाविद्यालयातील ६५ टक्के विद्यार्थी शिक्षकांना भारतीय राज्यघटनेत किती मूलभूत हक्क व अधिकार नमूद आहेत हे अचूकपणे माहिती नाही हे दिसून येते.

४. बी.एड.महाविद्यालयातील ५६.२५ टक्के विद्यार्थी शिक्षकांना भारतीय राज्यघटनेत किती मूलभूत कर्तव्ये नमूद केले आहेत हे अचूकपणे माहिती नाही हे दिसून येते.

५. देशाच्या सार्वभौमत्वाच्या रक्षणाची जबाबदारी नागरिकांची आहे असे ६९ टक्के विद्यार्थी-शिक्षकाचे मत आहे.

६. ४५ टक्के विद्यार्थी - शिक्षकांना मूलभूत कर्तव्ये व अधिकारामागची पार्श्वभूमी थोडीफार माहिती आहे.

७. मूलभूत कर्तव्ये व अधिकारांचे मानवी जीवनातील महत्व ६६ टक्के विद्यार्थी - शिक्षकांना अल्पप्रमाणात माहिती आहे.

शिफारशी

१. बी.एड. विद्यार्थी शिक्षकांमध्ये भारतीय संविधानाबाबत जागृती होण्यासाठी सर्वच शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये संविधान मंडळाची स्थापना करणे गरजेचे आहे.

२. बी.एड. विद्यार्थी शिक्षकांमध्ये भारतीय संविधानाबाबत जागृती होण्यासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमधील परिपाठामध्ये राष्ट्रगीत व प्रार्थना एवढेच मूलभूत अधिकार व कर्तव्ये वाचनाला महत्व देणे आवश्यक आहे.

३. सर्वच बी.एड. महाविद्यालयात संविधानातील मूलभूत कर्तव्यांचे व अधिकांराचे पोस्टरला महाविद्यालयाच्या दर्शनी भागात स्थान द्यावे. जेणे करुन विद्यार्थ्यांच्या दररोज दृष्टीस पडेल.

४. सर्वच बी.एड. महाविद्यालयांत संविधानातील मूलभूत हक्क व कर्तव्यांची जाणीव जागृतीसाठी विविध स्पर्धाचे आयोजन करणे आवश्यक आहे. उदा. प्रश्नमंजुषा, वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, पास्टरप्रदर्शन, तज्ज्ञाचे व्याख्याने व विद्यार्थ्यांचेच परिसंवाद इत्यादी.

५. सर्वच बी.एड. महाविद्यालयांमध्ये भारतीय संविधानाबाबत जागृती होण्यासाठी सातत्याने विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्रे व विविध स्पर्धाचे आयोजनाला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

१. कारेकर मंजिरी, (२०१२), भारताचे शासन आणि राजकारण, चौथी आवृत्ती, नवी दिल्ली : नॅशनल बुक ट्रस्ट

२. www.constitution.org

३. कुंडले, म.बा. (२००३), शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, आवृत्ती दहावी, पुणे : श्री विद्या प्रकाशन

४. तापकीर, दत्तात्रेय. तापकीर, निर्मला. (२००८), शिक्षणाचे तात्विक व समाजशास्त्रीय अधिष्ठान, पुणे : नित्यनूतन प्रकाशन

५. पारसनीस, न.रा. (पुनर्मुद्रण २००५), शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्र भूमिका, पुणे : नूतन प्रकाशन

६. ग्रोवर बी.एल.व बेल्हेकर,एन्. के. (अनुवादक), (पुनर्मुद्रण २०१३), आधुनिक भारताचा इतिहास,नवी दिल्ली : एस.चंद आणि कंपनी, प्रा. लि.